# कृषि महाविद्यालय

(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)

गडचिरोली-४४२६०५ महाराष्ट्र

फोन :(०७१३२)२२३०६१

डॉ. एम. एम. राऊत फॅक्स:(०७१३२)२२३०६२

सहयोगी अधिष्ठाता ई मेल agricollegegadchiroli@gmail.com


जा.क्र.स.अ/आस्था/कृमवि/बाह्यस्त्रोकम/३८०/२०२५ दिनांक : १७/०६/२०२५

## दरपत्रकाचे सुचना

प्रति,

----------------------

----------------------

----------------------

विषय :- कृषि महाविद्यालय, सोनापूर-गडचिरोली येथे ०६ सुरक्षा रक्षकाच्या सेवा (पुरुष आणि महिला) तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सन -२०२५-२६ या आर्थिक वर्षात ०६ महिन्याचे कालावधीसाठी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे दरपत्रके सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयावरील अनुषंगाने कृषि महाविद्यालय, सोनापुर-गडचिरोली येथे तात्पुरत्या स्वरूपात ०६ सुरक्षा रक्षकाची सेवा ०६ महिने कालावधी करीता पुरविण्यासाठी प्रस्तावित आहे. सदर सुरक्षा रक्षकास कृषि महाविद्यालयाची मुख्य प्रशासकिय इमारत व त्यासमोरिल व मागिल बाजुचे परिसर, मुलांचे वसतीगृह व मुलींचे वसतीगृहात महिला सुरक्षा व्यवस्था पाहण्याचे कार्य पार पाडावयाचे आहे.

तरी सुरक्षा रक्षकाची उपलब्धता व दरपत्रके खालील दर्शविलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहुन या कार्यालयास पुरविण्यात यावे.

### PROFORMA FOR SUBMISSION OF QUOTATION (COMMERCIAL BID)

| Sr. No. | Description | Unskilled contractual labour (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Basic Wages | 4680 |
| 2 | Variable Dearness Allowance | 4259 |
| | **Total Minimum Wages** | 8939 |
| 3 | EPF 13% | 608 |
| 4 | ESIC 3.25% | 152 |
| 5 | **Total Rs.** | 9699 |
| 6 | Service Charges for Company/ Firm Charges* | |
| 7 | GST 18% (if applicable) | |
| 8 | Total with GST | |
| 9 | **Rate per month per unit for skilled/ unskilled** | 9699 |

Scanned with OKEN Scanner

**नोंद :-उपरोक्त नमुद दर हे किमान वेतन कायद्यानुसार असुन या पेक्षा कमी दर ग्राह्य धरण्यात येणार नाही. कंत्राटदारास लागू असल्यास इतर बाबी योग्य स्पष्टीकरण व कागदपत्रांसह नमूद करु शकतात.**

**अटी व शर्ती :-**

१) सुरक्षा रक्षकाची सेवा पुरवितांना शारिरिक दृष्ट्या सुदृढ असावा तसेच गणवेश धारक व आवश्यक साहित्य असावे व अनुभव धारकांना प्राधान्य देण्यात यावे.

२) कृषि महाविद्यालय ईमारत, प्रक्षेत्र, मुलांचे वसतीगृह व मुलींचे वसतीगृह यांचे सुरक्षतेची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदार संस्थेवर राहील.

३) कराराचा कालावधी माहे जुलै - २०२५ पासुन किंवा सेवा सुरू झाल्यापासुन ०६ महिन्यांकरीता राहील.

४) विद्यापीठ परीपत्रक दिनांक २२ जुन,२०२१ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन,विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधि,कॅशलेश पदधतीचा अवलंब इ. सुविधा पुरविणे बंधनकारक आहे.

५) आपले संस्थेमार्फत पुरविले जाणारे कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर/विद्यापीठावर राहणार नाही असा करारनामा रु.५००/- चे बॉंड पेपरवर करणे आवश्यक राहील.

६) आपले संस्थे मार्फत पुरविले जाणारे कंत्राटी कर्मचाऱ्यास दरमहा दहा तारखेच्या आत किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करणे बंधनकारक राहील.

७) पुरवठाधारकांनी दरपत्रक सादर करते वेळी संस्थेचे नोंदणी क्रमांक, जिएसटी क्रमांक,पॅन क्रमांक व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ESIC, सबंधीत कामगार कार्यालयाचे नोंदणीचे प्रमाणपत्रे दरपत्रके सादर करतेवेळी कागदपत्राची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

८) सदर दरपत्रकात मासिक कालावधीचा दर नमुद करून सेवेचा कालावधी ०६ किंवा त्यापेक्षा कमी कालावधी निश्चित राहील, यात कुठलाही बदल ग्राह्य धरता येणार नाही.

९) सुरक्षा रक्षकाचे कामकाजाचे वेळ आळीपाळीने ८.०० तासाचे राहील.

१०) कामाच्या वेळी सुरक्षा रक्षकास कोणत्याही प्रकारची इजा झाल्यास कृषि महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

११) संस्थेकडुन निश्चित केलेले दर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता वैध राहील.

१२) सदर दरपत्रक मा.सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, सोनापुर-गडचिरोली यांचे नावाने सिलबंद पॉकिटात सादर करतांनी लिफाप्यावर सुरक्षा रक्षक च्या सेवा पुरविण्यासाठी दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.

१३) सदर दरपत्रक दिनांक २४.०६.२०२५ ला ५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रत्यक्षात किंवा टपालाने प्राप्त होणे आवश्यक आहे. उशिरा प्राप्त झालेल्या दरपत्रकासंबंधी दावा ग्राह्य धरता येणार नाही.

१४) दरपत्रकासंबंधी दर मान्य करणे अथवा अन्य कारणास्तव दर रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाचे कार्यालय प्रमुखांना राहतील.

**सहयोगी अधिष्ठाता**
**कृषि महाविद्यालय सोनापूर-गडचिरोली**

प्रतिलिपी :-

प्रभारी अधिकारी, (ARIS Cell) प्रभारी डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना सदर दरपत्रक सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या विनंतीसह अग्रेषीत.

Scanned with OKEN Scanner